7 APR 2017

लोकसत्ता



जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# रयत शिक्षण संस्थेस कणबरकर पुरस्कार

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**शिवाजी विद्यापीठाच्या** वतीने प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार यंदा सातारा येथील रयत शिक्षण संस्थेस प्रदान करण्यात येणार आहे. १ लाख ५१ हजार रुपये, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असून, येत्या १३ एप्रिल रोजी पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. श्रीमती शालिनी रामचंद्र कणबरकर आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मरणार्थ प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार दर वर्षी त्यांच्या स्मृतिदिनी म्हणजे १३ एप्रिल रोजी शिवाजी विद्यापीठामार्फत प्रदान केला जातो. गतवर्षी पहिला पुरस्कार भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव यांना प्रदान करण्यात आला होता. रयत शिक्षण संस्थेने शिक्षण क्षेत्रात अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यात पोहोचवण्यासाठी रयत शिक्षण संस्था स्थापन करण्याची घोषणा दिली. नेर्ले येथे सर्व जातिधर्माच्या मुलांसाठी वसतिगृह काढले. महात्मा गांधीजींच्या प्रभावामुळे त्यांनी स्वदेशीचे व अनवाणी चालण्याचे व्रत घेतले. गांधीजींच्या हस्ते साताऱ्यात श्री छत्रपती शाहू बोर्डिंगचे नामकरण केले. ही संस्था आज आशियातील सर्वात मोठ्या शिक्षण संस्थांपैकी एक मानली जाते. महाराष्ट्राच्या १५ जिल्ह्यांसह कर्नाटकातील एका जिल्ह्यात ४२ महाविद्यालये, ४३८ माध्यमिक विद्यालये, आठ अध्यापक विद्यालये, ४२ प्राथमिक, ३१ पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा व ८० वसतिगृहे, दोन आयटीआय, अन्य ६५ अशा एकूण ७१६ शाखा, साडेचार लाखांहून अधिक विद्यार्थी आणि १५ हजार सेवक एवढा प्रचंड विस्तार संस्थेचा आहे.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 7 APR 2017
सकाळ

# विद्यापीठात पीओएस सेवा

कोल्हापूर, ता. ६ : केंद्र सरकारच्या रोखविरहित आर्थिक व्यवहारांना चालना देण्याच्या धोरणाला बळकटी देण्याच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठानेही कॅश विभागात बसविलेल्या पॉईंट ऑफ सेल (पीओएस) यंत्र सेवेस आजपासून सुरवात झाली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सेवेस प्रारंभ झाला. ॲक्सिस बँकेच्या सहकार्याने रोखरहित व्यवहारांसाठी 'पीओएस' यंत्रे बसविली आहेत. डॉ. शिंदे म्हणाले, ''बहुतांश विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडे एटीएम-डेबिट कार्ड असतात. त्या सर्वांनी पीओएसद्वारे किंवा अगदी मोबाईलवरून यूपीआय, भीम ॲपच्या माध्यमातून देणी भागविल्यास सरकारचा हा उपक्रम निश्चितपणे यशस्वी करू शकतो.'' प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी विद्यापीठात ज्या ज्या ठिकाणी व्यवहार केले जातात, अशा ठिकाणी पीओएस बसविण्यात येणार असल्याची माहिती दिली.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 7 APR 2017
पुढारी

# विद्यार्थ्यांनी 'पीओएस' सुविधेचा लाभ घ्यावा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या रोखविरहित आर्थिक व्यवहारांना चालना देण्याच्या धोरणाला बळकटी देण्याच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठानेही कॅश विभागात 'पॉईंट ऑफ सेल' (पीओएस) यंत्रे बसविली आहेत. विद्यार्थी, पालक आणि विद्यापीठाशी संबंधित यंत्रणांनी त्याद्वारे अधिकाधिक रोखविरहित व्यवहार करण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कॅश विभागामध्ये ॲक्सिस बँकेच्या सहकार्याने रोखरहित व्यवहारांसाठी 'पीओएस' यंत्रे बसविण्यात आली आहेत. या सेवेस कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते औपचारिक सुरुवात करण्यात आली. यावेळी डॉ. शिंदे बोलत होते.

या प्रसंगी कुलगुरूंनी 'पीओएस' सेवेबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी विद्यापीठात ज्या ज्या ठिकाणी आर्थिक व्यवहार केले जातात, अशा सर्व ठिकाणी पीओएस यंत्रे बसविण्यात येणार असल्याची माहिती दिली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह ॲक्सिस बँकेचे अधिकारी व विद्यापीठाच्या लेखा विभागातील अधिकारी व सेवक उपस्थित होते. यावेळी रोख रक्कम भरण्यासाठी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांशी कुलगुरूंनी संवाद साधला.

- 7 APR 2017

पुढारी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांमुळे विद्यार्थी ज्ञानाने समृद्ध

## संचालक महेश काकडे : शिवाजी विद्यापीठांतर्गत नेट-सेट मार्गदर्शन कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिक्षकी पेशा हा जबाबदारीचा आणि पर्वणीचा पेशा आहे. विद्यार्थ्यांना ज्ञानाची कवाडे उलगडून समृद्ध करणाऱ्या शिक्षकांना त्यामुळे सेट-नेट मार्गदर्शन कार्यशाळा आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठांतर्गत दूर शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित एकदिवसीय नेट-सेट मार्गदर्शन कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून संचालक काकडे बोलत होते. अध्यक्षस्थानी दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे होते. यावेळी उपकुलसचिव कॅप्टन डॉ. नितीन सोनजे उपस्थित होते.

संचालक काकडे म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्याने भविष्याबद्दल आशावादी राहिल्यास यशाचा मार्ग सोपा होईल. आज प्रत्येकाला आपापल्या क्षेत्रांची जाणीव निर्माण झाली आहे. यासाठी बहुतांश जण मेहनत घेताना दिसून येतात. प्रत्येकाने स्वत:मधील भ्रम दुरुस्त करण्यासाठी योग्य असाच रस्ता निवडला पाहिजे. आजचे विद्यार्थी शिक्षकी पेशाकडे वळत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. यामध्ये मुलींची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे आगामी काळात देश कोणत्या दिशेने जात आहे याची ही झलक दिसून येते. आज प्रत्येक क्षेत्र आव्हानात्मक बनले आहे. समाजात संस्कृतीचा विचार फक्त शिक्षणामुळे शिल्लक राहिला आहे. हा संस्कार आपण विसरून चाललो आहोत. तो टिकवणे व रुजवण्याचे काम शिक्षणातूनच होईल.

कार्यशाळेसाठी सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातून ८० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. गजानन राशनकर, प्रा. डॉ. एम. ए. अनुसे, डॉ. के. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना सेट-नेट परीक्षेबाबत अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, वेळेचे महत्त्व, परीक्षेची तयारी, प्रश्न सोडविण्याचे तंत्र याविषयी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नावर समर्पक चर्चा केली.

स्वागत डॉ. एस. एम. अपराज यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. आभार डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी मानले. यावेळी दूरशिक्षण केंद्राचे सर्व समन्वयक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 7 APR 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात केमिस्ट्री विभागाची नवीन इमारत उभारणार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठात केमिस्ट्री विभागासाठी स्वतंत्र इमारत साकारणार आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ऑनलाईन निविदा मागवण्यात आल्या आहेत. ई-निविदा १२ मे २०१७ रोजी उघडण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती व ई-निविदा प्रणाली बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.